नि. फौ. मा. क्र. ४८५/२०२३
शासन –वि–अनिल
निशाणी क्रं. १३

**<u>सरकार तर्फे सा. क्र. १ यांची साक्ष</u>**

नांव – ऋषीकुमार रतीपालसिंग ठाकूर,
वय – ६० धंदा – सेवानिवृत्त,
रा. विसावा कॉलनी, पिंपळगाव,
यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

**<u>सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत</u>**

मी सन–२०१९ मध्ये यवतमाळ येथे एल.सी.बी., टोळी विरोधी पथकामध्ये ए.एस.आय. म्हणून कार्यरत होतो. दि. १९/१२/२०१९ रोजी रात्री १८.५५ वाजता मी, अमोल चौधरी व इतर पोलीस कर्मचारी असे गस्त घालीत असतांना आमच्या साहेबांना माहीती मिळाली की, कुरेशीपुरा, दग्र्या जवळ एक इसम हा चिलमीमध्ये गांजा टाकून, धूर आतमध्ये ओढत फुकत आहे. त्यानंतर आम्ही घटनास्थळी गेलो असता तेथे एक इसम दिसला. कोयल साहेबांनी त्याच्या जवळील चिलम व त्याच्या खाली असलेला कपडा घेतला. त्याला नाव गांव विचारले असता त्याने अनिल बहादे रा. पाटीपुरा असे सांगितले. त्याला एन.डी.पी.एस. तरतुदी प्रमाणे विचारणा केली. त्यानंतर साहेबांनी दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविला. मी कोयल साहेबांसोबत काम केल्यामुळे त्यांची सही ओळखतो. त्यावर कोयल साहेबांची, दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्याला **<u>नि. क्र. १४</u>** दिला. साहेबांनी आरोपीच्या रक्ताचे व लघवीचे नमूने घेवून त्याचा पंचनामा तयार केला. आता मला तो जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर कोयल साहेबांची, दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्याला **<u>नि. क्र. १५</u>** दिला. त्यानंतर साहेबांनी आरोपी

विरुध्द एन.डी.पी.एस. कायद्याअंतर्गत पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**०२. <u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री ए. आर. ठाकरे–</u>**

हे म्हणणे खरे आहे की, मला गस्तकामी वरिष्ठांचा लेखी आदेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यातून गस्त कामी व इतर कामासाठी जात असताना लॉग बुक व स्टेशन डायरीमध्ये नोंद करीत असतो. मी पोलीसांना केस डायरीची प्रत दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणताही आदेश नसताना मी गस्त कामी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला वार्षीक व मासिक टारगेट असल्या कारणाने आम्ही आरोपी विरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**०३. फेर तपासः– काही नाही.**

वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.07.07 16:09:43 +0530

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.07.07 16:09:57 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक ०७/०७/२०२५.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ